# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ३३९** **दिनांक :- ०३/१२/२०२१**

## घरफोडी करणाऱ्या परदेशी आरोपींना अटक करून एकूण १३,९३,०००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत- वसई पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

दिनांक ३०/११/२०२१ रोजी वसई पोलीस स्टेशन हददीत बाभोळा नाका, वसई (प) येथे राहणारे तक्रारदार हे कुटूंबासह दि. २८/११/२०२१ रोजी बाहेरगावी गेले असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीनी त्यांच्या घराचा मुख्य दरवाजा व इतर दरवाज्याचे लॉक तोडून घरामध्ये प्रवेश करुन सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम तसेच इतर मौल्यवान वस्तु असा एकूण १५,२०,०००/- रुपयाचा मुद्देमाल चोरी केला होता. त्याबाबत वसई पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ४२१/२०२१ भादविक ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री. प्रदिप गिरीधर, सहा. पोलीस आयुक्त, वसई विभाग, श्री. कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे यांनी सदर गुन्हयाचे घटनास्थळाला तात्काळ भेट देवून फिंगरप्रिंट, श्वानपथक यांना घटनास्थळी पाचारण केले. त्याचबरोबर सदर गुन्ह्याचा जलदगतीने तपास करण्याकरीता ०४ तपास पथके तयार करुन सुरत, पनवेल, वसई व इतर परिसरामध्ये रवाना केले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वसई पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक कौशल्याचा वापर करुन जलदगतीने तपास केला व आरोपी निष्पन्न करुन ते नेपाळला वाहनाने पळून जात असताना पाठलाग करुन ते त्यांचे मुळ देश नेपाळ येथे पलायन करणेपुर्वी त्यांना ताब्यात घेतले. सदर आरोपींची नावे १) सुरेंद्र अम्रीत बोगाटी वय ४७ वर्ष, व्यवसाय- वॉचमन, रा. मंगलसेन नगर पालीका तीन, लाचेमाना गाव, अच्छाम, नेपाळ २) झपातसोप शरपजीत सोप, वय ४५ वर्ष, व्यवसाय- वॉचमन, रा. मंगलसेन नगर पालीका तीन, लाचेमाना गाव, अच्छाम, नेपाळ ३) शेरबहादुर फुलबहादुर शाही, वय ३२ वर्ष, व्यवसाय- वॉचमन, रा. मालकोट गाव, मानामा, जिल्हा कालीकोट, नेपाळ यांना अटक करुन त्यांच्याकडून एकुण १८० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ०८ किलो वजनाचे चांदीचे दागिने व इतर मौल्यवान वस्तु, किंमती १० घडयाळे, ०१ लॅपटॉप, ०१ आयपॅड व रोख रक्कम १,२३,०००/- रु. असा एकुण १३,९३,०००/- रुपयांचा मुददेमाल नमुद आरोपींकडुन हस्तगत केलेला आहे.

सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी नामे सुरेंद्र अम्रीत बोगाटी हा तक्रारदार यांच्या घरी मागील एक वर्षापासून सुरक्षा रक्षकाचे काम करित होता. त्यामुळे सदर आरोपी याने तक्रारदार यांच्या घराची पुर्ण रेखी

करुन त्याचे ईतर तीन नातेवाईक असलेले साथीदार मिळून नियोजनबद्ध कट रचून सदरचा गुन्हा केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री. प्रदिप गिरीधर, सहा. पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे, श्री. ऋषिकेश पवळ, पोलीस निरिक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. राम सुरवसे, सपोनि. सुनिल पवार, हेड कॉ./१२९५ सुनिल मलावकर, पो.कॉ/२०५२ दत्तात्रेय मुंढे, अमोल पाटील, जाधव, भालेराव, अमोल बर्डे यांच्या पथकाने केलेली आहे.



---ooo---